# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २०/११/२०२०

## जिल्हा : जळगाव

### हवामान अंदाज :

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२०/११/२०२० ते २४/११/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| पाऊस (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कमाल तापमान (अं.से.) | 33 | 32 | 31 | 31 | 31 |
| किमान तापमान (अं.से.) | 20 | 18 | 17 | 17 | 16 |
| ढग स्थिती (आकाश) | 1 | 2 | 0 | 1 | 0 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 51 | 42 | 43 | 44 | 42 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 33 | 33 | 26 | 31 | 29 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 8 | 9 | 7 | 9 | 9 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 56 | 69 | 99 | 105 | 104 |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २० ते २४ नोव्हेंबर, २०२० दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • खरीप पिकांची काढणी, मळणी करावी व सदर काढलेल्या पिकांची सुरक्षित ठिकाणी साठवण करावी.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• तसेच शेतकरी बंधूनी मेघगर्जना व विजेचा पूर्वानुमाना करीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| कापूस | बोंडे अवस्था ते पक्वता | शेतातील अंदाजे ३० ते ३५ टक्के बोंडे फुटल्यावर पहिली वेचणी करावी त्यानंतर १५ ते २० दिवसाच्या अंतराने २ ते ३ वेचण्या कराव्यात. कापूस वेचताना चांगला कापूस प्रथम वेचावा. नंतर पावसात भिजलेला पिवळसर रंग असलेला व किडका आणि कवडी कापूस वेगळा वेचावा. वेचल्यानंतर कापूस ३ ते ४ दिवस उन्हात वाळवून स्वच्छ व कोरड्या जागेत साठवावा. |
| गहू | पेरणी अवस्था | पेरणीनंतर जरुरी प्रमाणे १ किंवा २ वेळा खुरपणी करावी. पीकच्या जोमदार वाढीसाठी पीक सुरूवातीपासूनच तण विरहीत ठेवावे. |
| हरभरा | पीक वाढीची अवस्था | पीकच्या जोमदार वाढीसाठी पीक सुरूवातीपासूनच तण विरहीत ठेवणे आवश्यक आहे. पीक २० दिवसाचे असताना पहिली आणि ३० दिवसाचे असताना दुसरी कोळपणी करावी. कोळपणी केल्याने जमीन भुसभूशीत होवून जमिनीत हवा खेळती राहते व त्यायोगे पीक वाढीस पोषक वातावरण तयार |

| | | |
|---|---|---|
| | | होते तसेच जमिनीतील बाष्पीभवनाचा वेग कमी होवून ओल अधिक काळ टिकण्यास मदत होते. कोळपणी शक्यतो वाफशावर करावी. कोळपणीनंतर ऐक खुरपणी करावी. पहिल्या ३०-४५ दिवसात शेत तणविरहीत ठेवावे हे उत्पादनाच्या दृष्टीने आवश्यक असते. हरभरा पिकांत पक्षी थांबे म्हणून ज्वारीच्या दाण्याचा उतवडा करावा. |
| तुर | फुलोरा | तूर पिकावरील शेंग अळीच्या नियंत्रणासाठी ५ कामगंध सापळे प्रति हेक्टर लावावेत तसेच ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी. तुरीमधील फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये घाटे अळी/पिसारी पतंग व शेंग माशी यासाठी एकात्मिक किड व्यवस्थापन पध्दतीने नियंत्रण करावे यामध्ये तृण धान्याचे आंतरपिक असल्यास किडीचे प्रमाण कमी राहण्यास मदत होते, एच.एन.पी.व्ही **(HNPV)** ग्रा जैविक किडनियंत्रणाचा वापर करावा .फुलकळी लागताना पहिली फवारणी निबोंळी अर्क ५ **%** दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १२ ते १५ दिवसांनी हेलीओकील **(HNPV)** ५०० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टर व गरजेनुसार तिसरी फवारणी १८.५ **%** प्रवाही क्लोरअँट्रीनिलीप्रोल १५० मिली अथवा इमामेक्टीन बेझोएट २०० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| वांगी | पीक वाढीची अवस्था | सध्याच्या कोरड्या हवामानात वांग्यामध्ये रस शोषक कीडी जसे तुडतुडे, पंढरी माशी, मावा याच्या नियंत्रणासाठी फॉस्फामिडॉन ४० **%** एस. एस. १५ मिली किंवा फेनप्रोप्यथ्रीन ३० **%** ई. सी. ५ मिली या कीटकनाशकाच्या आलटून पालटून फवारण्या कराव्यात. अधूनमधून ५ **%** निंबोळी अर्कची फवारणी करावी. |
| काकडी व वेलवर्गीय | पीक वाढीची अवस्था | काकडी व वेलवर्गीय भाजीपालामधील फळमाशी किडीच्या व्यवस्थापनासाठी हेक्टरी १५ ते २० क्युलुरचे गंध सापळ्याचा वापर करावा . काकडी व वेलवर्गीय भाजीपाला पिकावरील केवडा या रोगाच्या नियंत्रणासाठी मेटेंलॅक्झील ८ **%** **+** मॅन्कोझेब ६४ **%,** हे संयुक्त बुरशीनाशक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारावे. |
| मिरची | पीक वाढीची अवस्था | मिरची पिकावरील रस शोषक किडींच्या वाढीची शक्यता असल्याने त्याच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची किंवा इमिडाकलोप्रीड १७.८ एस एल ५ मिली किंवा फिप्रोनील ५ एस.सी. १५ मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| कांदा | पीक वाढीची अवस्था | सध्याच्या कमाल आणि किमान तापमानातील जास्त तफावतीमुळे कांदा पिकावरील फुलकिडे व करपा या किडीच्या व रोग नियंत्रणासाठी डायमेथोयएट ३० % ईसी १५ मिली किंवा ल्याम्डा सायहयालोथ्रीन ५ % ई सी ६ मिली **+** टेब्यूकोनॅझोल १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| चारा पिक | पेरणी अवस्था | रब्बी हंगामात पशुधनासाठी मका, ओट, बरसीम**,** लसून घास व ज्वारी या चारा पिकाची जमिनीत वापसा आल्यावर पेरणी करावी. |
| आंबा | | गावठी व अनुउत्पादक झाडांचे सुधारित जातींमध्ये रुपांतर करण्यासाठी आंब्याची झाडे जमिनीपासून २ मीटर उंचीवर छाटून फांदीवरील नवीन फुटव्यावर फुब्रूवारी ते मार्च महिन्यामध्ये केसर वाणाचे पाचर कलम करावे. आंबा पिकावर नविन फुटीवरील किड रोगांच्या नियंत्रणासाठी लॅमडा सायहेलोथ्रीन ५**%** ईसी ६ मिली किंवा क्विनॉलफॉस २५ मिली + पाण्यात विरघरळणारे गंधक २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| केळी | | केळी पिकावरील करपा रोग नियंत्रणासाठी रोगग्रस्त पानांचा भाग किंवा पाने काढून जाळावीत. झाडावर कार्बनडेन्झिम १० ग्रॅम किंवा डायथेन एम **-** ४५, २५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झीक्लोराईड २५ ग्रॅम १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. केळी बागेत काकडी, भोपळा, कलिंगड, खरबूज तसेच मिरची, वांगी यासारखी पिके घेणे कटाक्षाने टाळावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जनावरांचा गोठा व दुध काढण्याची जागा शक्यतो वेगळी असावी. दुध काढण्यासाठी स्वच्छ मोकळी जागा वापरावी. सर्व जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे. पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक |

| | | |
|---|---|---|
| | | पाजावे. तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पिण्यास स्वच्छ पाणी द्यावे. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : २०.११.२०२०

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**